**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः16.07.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- भारताची निर्यात जून महिन्यात पाच पूर्णांक चार दशांश टक्क्यांनी वाढून 65 अब्ज 47 कोटी डॉलरवर.

- विमानप्रवास अधिक सुलभ आणि सर्वांना परवडणारा करण्याला सरकारचं प्राधान्य असल्याचं नागरी विमानवाहतूक मंत्री के आर नायडू यांचं प्रतिपादन.

- अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी रिपब्लिकन पक्षाकडून माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अधिकृत उमेदवारी जाहीर.

- स्वीडिश खुल्या टेनिस स्पर्धेत आज पुरुष एकेरीच्या फेरीत भारताच्या सुमित नागलची लढत स्वीडनच्या एलियास यमरशी होणार

आणि

- संपूर्ण पश्चिम किनारपट्टी आणि गुजरातमध्ये आज मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज.

## भारत निर्यात

भारताची निर्यात जून महिन्यात पाच पूर्णांक चार दशांश टक्क्यांनी वाढून 65 अब्ज 47 कोटी डॉलरवर पोचली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं ही आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. एप्रिल ते जून या तिमाहीतही निर्यात आठ पूर्णांक सहा दशांश टक्क्यांनी वाढून 200 अब्ज 33 कोटी डॉलरवर पोचली आहे. अभियांत्रिकीविषयक सामग्री, इलेक्ट्रॉनिक उत्पादनं, औषधं, कॉफी इत्यादींची निर्यात वाढल्यामुळे भारताकडून होत असलेल्या निर्यातीला बळ मिळाल्याचं वाणिज्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

## विमान परिषद

विमानप्रवास अधिक सुलभ आणि सर्वांना परवडणारा करणं याला सरकारचं प्राधान्य असून, विमान वाहतूक सर्वदूर नेण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असं केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी काल  नवी दिल्ली इथं सांगितलं. दुसऱ्या आशिया पॅसिफिक मंत्रिस्तरीय परिषदेच्या पूर्वतयारीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. देशात नागरी विमान वाहतुकीकरिता मजबूत पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सरकारनं केलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी यावेळी दिली. विमान वाहतूक क्षेत्राच्या भविष्यासाठी टिकाऊपणा हा दृष्टिकोन केंद्रस्थानी असणे आवश्यक असून, कार्बन फुटप्रिंट कमी करण्यासाठी पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर आणि विमान वाहतूक क्षेत्राला नवे आयाम देण्यासाठी हरित तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करण्याचीही गरज त्यांनी अधोरेखित केली.

दुसरी आशिया पॅसिफिक मंत्रीस्तरीय परिषद यावर्षी 11 आणि 12 सप्टेंबर रोजी नवी दिल्ली इथं होणार आहे. या परिषदेत प्रमुख विमान वाहतूक कंपन्या, संघटना, उद्योजक, तज्ज्ञ नागरी विमान वाहतूक क्षेत्राच्या भविष्याबाबत चर्चा करणार आहेत.

**विमान कर**

सरकारनं आजपासून सर्व विमानं आणि विमान इंजिनाच्या विविध भागांवर पाच टक्के एकसमान एकात्मिक वस्तू आणि सेवा कर अर्थात आयजीएसटी लागू केला आहे. याआधी वेगवेगळ्या प्रकारासाठी हा दर पाच, बारा, अठरा ते 28 टक्क्यांपर्यंत आकारला जात असल्यानं तसंच तो वेगवेगळ्या खात्यांमध्ये जमा होत असल्यानं ही कररचना जटिल झाली होती. ती एकसमान दर लागू करून सुटसुटीत केली असल्याचं  किंजरापू राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे.

**अंमली पदार्थ**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा नवी दिल्लीत अमली पदार्थविषयक समन्वय केंद्राच्या सातव्या शिखर परिषदेचं अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. गुरुवारी होणाऱ्या या परिषदेत अमित शहा अमली पदार्थ निषेध माहिती केंद्र म्हणजे मानस या हेल्पलाइनचं उद्घाटन करणार आहेत. अंमली पदार्थ नियंत्रण विभागाच्या श्रीनगर विभागीय कार्यालयाचंही ते उद्घाटन करणार आहेत. अमली पदार्थांना आळा घालण्यासाठी विविध केंद्रीय आणि राज्य सरकारी संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठीच्या उपाययोजनांवर या परिषदेत चर्चा केली जाईल. भारताला 2047 पर्यंत अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी संस्थात्मक रचना, समन्वय आणि जनजागृती या त्रिसूत्रीवर काम केलं जाईल असं गृह मंत्रालयानं म्हटलं आहे.

## तेलंगण कर्जमाफी

तेलंगण सरकारनं शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी नियमावलींची अधिसूचना काल प्रसिद्ध केली. शेतकऱ्यांच्या एका कुटुंबाला दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात येणार आहे, असं या नियमावलीत नमूद करण्यात आलं आहे. शेतकरी कुटुंब निश्चित करण्यासाठी नागरी पुरवठा विभागानं दिलेली अन्नसुरक्षा पत्रिका ग्राह्य धरली जाणार आहे. बारा डिसेंबर 2018 ते 9 डिसेंबर 2023 या काळात शेतकऱ्यांनी व्यावसायिक बँका, ग्रामीण बँका आणि जिल्हा सहकारी बँका यांच्यामार्फत घेतलेल्या अल्प मुदतीच्या कर्जांना माफी दिली जाईल, असंही या नियमावलीत स्पष्ट करण्यात आलं आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी तेलंगण सरकार एक विशेष संकेतस्थळही सुरू करणार आहे.

## पीकविमा

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्याची मुदत येत्या 31 जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेची अंतिम मुदत कालपर्यंत म्हणजे 15 जुलैपर्यंत होती. मात्र, महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांनी अजूनही पीक विमा भरलेला नाही; त्यामुळे पीक विमा भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केली होती. त्यांच्या मागणीनंतर ही मुदत 31 जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे.

## डोनाल्ड ट्रम्प

अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना रिपब्लिकन पक्षानं अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केलं आहे. मिलवॉकी इथं झालेल्या रिपब्लिकन राष्ट्रीय समिती सदस्यांच्या बैठकीत ट्रम्प यांना बहुमत मिळाल्यानंतर त्यांची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे ट्रम्प सलग तिसऱ्या वेळा रिपब्लिकन पक्षाचे अधिकृत उमेदवार असणार आहेत. नोव्हेंबर महिन्यात ही निवडणूक होणार आहे. ओहायोचे सेनेटर जे. डी. व्हान्स आपले उपाध्यक्षपदासाठीचे उमेदवार असतील, असं ट्रम्प यांनी जाहीर केलं आहे. व्हान्स यांची निवड करून ट्रम्प यांनी पेनसिल्व्हानिया, मिशिगन आणि व्हिस्कॉन्सिनसारख्या राज्यांवर आपला भर असल्याचं सूचित केलं आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी गोपनीय कागदपत्रांचा गैरवापर केल्याचा आरोप करणारं प्रकरण अमेरिकेतील एका जिल्हा न्यायालयानं फेटाळून लावलं आहे. या प्रकरणी जॅक स्मिथ यांची विशेष वकील म्हणून नेमणूक घटनाबाह्य असल्याचा निर्वाळाही न्यायाधीश एलीन कॅनन यांनी दिला आहे.

## पॅलेस्टाइन निधी

भारतानं पॅलेस्टाइनमधल्या निर्वासितांसाठी 25 लाख डॉलरचा निधीचा पहिला हप्ता काल संयुक्त राष्ट्रांच्या मदत संस्थेकडे म्हणजे यूएनआरडब्ल्यूएकडे काल जारी केला. भारतानं 2024-25 या वर्षात पन्नास लाख डॉलर मदत देण्याचं जाहीर केलं आहे. पॅलेस्टाइनमधल्या निर्वासितांसाठी औषधं, शिक्षण, मदत आणि सामाजिक सेवा यांच्यासाठी हा निर्धी वापरला जाणार आहे, असं समाजमाध्यमांवरच्या

संदेशात भारतानं म्हटलं आहे. गेल्या वर्षी भारतानं यूएनआरडब्लूला तीन कोटी पन्नास लाख डॉलरचा निधी दिला होता.

**जयशंकर दौरा**

परराष्ट्रमंत्री डॉक्टर एस. जयशंकर आजपासून दोन दिवसांच्या मॉरिशन दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात ते मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद जुगनाथ यांची भेट घेणार असून, मॉरिशसच्या मंत्र्यांसमवेत द्विपक्षीय बैठकाही घेणार आहेत. या भेटीमुळे द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्याची संधी मिळेल, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. ही भेट म्हणजे भारताच्या `शेजारी प्रथम` या धोरणाचं प्रतिबिंब असल्याचंही नमूद करण्यात आलं आहे.

**जम्मू अमरनाथ यात्रा**

अमरनाथ तीर्थयात्रेसाठी 4132 यात्रेकरूंची आणखी एक तुकडी जम्मूमधील भगवती नगर यात्री निवास शिबिराकडं रवाना झाली.  या तुकडीत 2872 पुरुष, 1168 महिला, 18 मुले, 68 साधू आणि सहा साध्वी  यांचा समावेश आहे. यातील 1808 यात्रेकरू पहाटे बालतल बेस कॅम्पसाठी रवाना झाले, तर 2324 यात्रेकरू पहलगाम बेस कॅम्पसाठी रवाना झाले. तिथून ते अमरनाथच्या गुहेकडे रवाना होतील.

**अपघात**

मुंबई- पुणे द्रूतगती महामार्गावर लोणावळ्याजवळ  काल मध्यरात्री, भाविकांनी भरलेली एक  खाजगी बस ट्रॅक्टरला धडकून झालेल्या भीषण अपघातात ५ भाविकांचा मृत्यू , तर 42 जण जखमी झाल्याच वृत्त आहे याबाबतच्या अधिक तपशीलची प्रतीक्षा आहे .

**स्वीडिश  ओपन**

स्वीडिश खुल्या टेनिस स्पर्धेत आज पुरुष एकेरीच्या फेरीत भारताच्या सुमित नागलची लढत स्वीडनच्या एलियास यमरशी होणार आहे, तर पुरुष दुहेरीच्या लढतीत आज संध्याकाळी सुमित नागल आणि पोलंडच्या कॅरोल ड्रझेविकी या जोडीचा सामना फ्रान्सच्या अलेक्झांड्रे म्युलर आणि लुका व्हॅन अशे या जोडीशी होईल. भारतीय टेनिसपटू सुमितनं या मोसमात हेलब्रॉन चॅलेंजर आणि चेन्नई चॅलेंजरसह दोन विजेतेपदं जिंकली आहेत.

**हवामान**

संपूर्ण पश्चिम किनारपट्टी आणि गुजरातमध्ये आज मुसळधार पाऊस होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, गुजरात, किनारपट्टीसह  कर्नाटक, सौराष्ट्र आणि कच्छमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. या भागांसाठी आज अतिमुसळधार आणि केरळमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील चार दिवसांत तेलंगण, आंध्र प्रदेशचा किनारपट्टीचा भाग आणि यानाम, छत्तीसगड, उत्तर  कर्नाटकात मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. ओडिशाच्या किनारपट्टीवर

कमी दाबाचं क्षेत्र तयार झाल्यानं गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशात मॉन्सून सक्रिय झाला आहे, असं भारतीय हवामान विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ, आर. के. जेनामानी यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**